PRAGATI ENGLISH SCHOOL PIMPRI PUNE-18 MAHESH NAGAR.

क्रं.-शिक्षण/प्राप्राशा/३/काचि/८२१/२००८.
शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८
दिनांक :- १७/१२/२००८.

प्रति,

मुख्याध्यापक,
प्रगती इंग्लिश स्कूल,
महेशनगर, पिंपरी, पुणे-१८.

विषय:- कायम विना अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना (माध्यम:- इंग्रजी) नैसर्गिक वाढीचा वर्ग/अतिरिक्त तुकडया मंजूर करणेबाबत...

संदर्भ:- १) शासन निर्णय क्रं. व्हीएलएस/१००२/(१०००/०२)/प्राशि-३ दि:-१४/०१/२००३
२) आपणांकडील दिनांक:- १६/१०/२००८ चा प्रस्ताव.

संदर्भांकित पत्रास अनुसरुन आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद इयत्तेच्या नैसर्गिक/अतिरिक्त तुकडया/वर्गांना सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| क्रं. | शाळेचे नांव व पत्ता. | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ प्रकार | अनुदानाचे प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रगती इंग्लिश स्कूल, महेशनगर, पिंपरी, पुणे-१८. | इंग्रजी | इयत्ता २ री ते ७ वी पर्यंत | नैसर्गिक | १) इ. २ री- सन १९९२-९३, २) इ. ३ री- सन १९९३-९४, ३) इ. ४ थी- सन १९९४-९५, ४) इ. ५ वी- सन १९९५-९६, ५) इ. ६ वी- सन १९९६-९७ व ६) इ. ७ वी- सन १९९७-९८ या शैक्षणिक वर्षात कायम विना अनुदानित तत्वावर प्रत्येकी प्रथम वर्ग मंजूर. |

शाळेने सदरचे वर्ग/तुकडी मंजूरीसाठी खाली नमूद केलेल्या अटीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१) शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे (एचएससी डी.एड/एसएससी डी.एड).
२) सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे.
३) सदर शाळेने स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली केलेली असावी.
४) शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५) सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पदांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६) सदर शाळेच्या तुकडीस विद्यार्थी संख्या नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.

वरील बाबींची पूर्तता करुन लेखी अहवाल एक महिन्यात सादर करावा.

प्रशासन अधिकारी
शिक्षण मंडळ,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे-१८.

Head Mistress
PRAGATI ENGLISH SCHOOL
Mahesh Nagar, Pimpri,
Pune-411 018.

Head - Master

Head Mistress
PRAGATI ENGLISH SCHOOL
Mahesh Nagar, Pimpri,
Pune - 411 018